महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे | Rs.2/- | कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

गुरुवार ❖१७ जुलै २०२५ ❖वर्ष - सातवे ❖अंक ०२६ ❖ पाने - ४ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024



news.thanejeevandeep@gmail.com
दैनिक ठाणे जीवनदीप WhatsApp Channels
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
9619188558 / 9082664781
www.jeevandeepvarta.com/
आपलं हक्काचं दैनिक, दररोज वाचा.


थोडक्यात महत्वाचे

## आज पडघा टोल नाक्यावर ठाकरे गट - मनसेचा मोर्चा



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पडघा(राजेश दळवी) : मुंबई नाशीक महामार्गावरील रस्त्यांच्या विविध मागण्यांसाठी शिवसेना (ठाकरे) मनसे व ईतर सामाजिक संघटनांच्या वतीने भिवंडी तालुक्यातील पडघा येथील टोल नाक्यावर मोर्चा धडकणार असुन टोल नाका बंद आंदोलन करण्यात येणार आहे.

पडघा टोल नाका रस्ता व त्यालगत असलेल्या सर्वीस रस्त्याची तात्काळ दुरुस्ती, परिसरातील विविध गावालगत सर्वीस रस्ते बनवणे, मुंबई नाशीक महामार्गावरील शेरेकर पाडा व विवीध गावाजवळ अंडरपास बनवणे, तळवली नाका येथील अंडरपास रस्त्याचे काम लवकर करणे आदी मागण्यांसाठी शिवसेना( ठाकरे) मनसे व पडघा परिसरातील ईतर सामाजिक संघटना यांच्या वतीने टोल बंद आंदोलन व मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. तशा अशयाचे निवेदन संबधीत शासकीय अधीकारी, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांना देण्यात आले होते. मात्र पोलीस प्रशासनाच्या मध्यस्थीने आंदोलनकर्ते व महामार्ग प्राधिकरण अधीकारी यांच्यात दोन वेळा चर्चा अयशस्वी ठरल्याने हा मोर्चा गुरूवारी १७ जुलै रोजी पडघा गांव प्रवेशद्वार ते टोल नाका येथे धडकणार असुन त्याची जय्यत तयारी झाली असल्याचे शिवसेना (ठाकरे) उपजिल्हाप्रमुख प्रकाश भोईर भिवंडी लोकसभा जिल्हाध्यक्ष शैलेश बिडवी यांच्या वतीने सांगण्यात आले.यावेळी दोन्ही संघटनां व ईतर सामाजिक संघटनांचे जिल्ह्यातील प्रमुख नेते उपस्थित राहणार असून या रस्त्यावरून प्रवास सुरक्षीत होण्यासाठी नागरीकांनी मोठ्या संख्येने या आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# फडणवीसांची उद्धव ठाकरेंना ऑफर

## सत्तेत सहभागी होण्याचं निमंत्रण

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांना खुली ऑफर दिली आहे, फडणवीस यांनी उद्धव ठाकरेंना सत्तेत सहभागी होण्याचं निमंत्रण दिलं आहे. अंबादास दानवे यांचा विधान परिषदेच्या विरोधी पक्षनेतेपदाचा कार्यकाळ संपला, त्यानिमित्तानं विधानसभेत निरोप समारंभाचं आयोजन करण्यात आलं होतं, यावेळी बोलताना देवेंद्र फडणवीस यांनी मोठं वक्तव्य केलं आहे.

उद्धवजी 2029 पर्यत काहीही स्कोप नाही, आम्हाला त्या बाकावर यायचा स्कोप नाही, तुम्हाला इथं यायचं असेल तर बघा, स्कोप आहे. ते आपण वेगळया पद्धतीने बोलू, असं फडणवीस यांनी म्हटलं आहे. देवेंद्र फडणवीस यांच्या या वक्तव्याची आता राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू आहे.

अंबादास दानवे यांचा विधान परिषदेच्या विरोधी पक्षनेतेपदाचा कार्यकाळ संपला आहे, त्यांच्या निरोप समारंभाच्या भाषणावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जोरदार टोलेबाजी केल्याचं पाहायला मिळालं.



### उद्धव ठाकरेंना सत्तेत येण्याचा स्कोप

देवेंद्र फडणवीस म्हणाले की, उद्धवजी आता 2029 पर्यंत काही करायचं नाही. आम्हाला तिकडे यायचा स्कोप उरला नाही. मात्र तुम्हाला इकडे यायचा स्कोप आहे. त्यावर वेगळ्या पद्धतीने विचार करता येईल. आपण वेगळ्या पद्धतीने बोलू.

उद्धवजी 2029 पर्यत काहीही स्कोप नाही, आम्हाला त्या बाकावर यायचा स्कोप नाही, तुम्हाला इथं यायचं असेल तर बघा, स्कोप आहे. ते आपण वेगळया पद्धतीने बोलू, असं म्हणत देवेंद्र फडणवीस यांनी थेट उद्धव ठाकरे यांना सत्तेत येण्याची ऑफर दिली आहे, फडणवीस यांच्या या वक्तव्याची आता जोरदार चर्चा सुरू झाली आहे. ठाकरेंचा शिवसेना पक्ष आजही आमचा मित्रपक्ष असल्याचंही यावेळी फडणवीस यांनी म्हटलं आहे.

मुंबईमध्ये पाच जुलै रोजी विजयी मेळावा पार पडला, या मेळाव्याला दोन्ही ठाकरे बंधुंची उपस्थिती होती, मनसे प्रमुख राज ठाकरे आणि शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांची उपस्थिती होती, या मेळाव्यानंतर पुन्हा एकदा मनसे आणि शिवसेना ठाकरे गटाच्या युतीची चर्चा रंगली आहे, याच दरम्यान आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरेंना सत्तेत सहभागी होण्याची ऑफर दिल्यानं फडणवीसांच्या या वक्तव्याची जोरदार चर्चा सुरू झाली आहे. ठाकरेंचा शिवसेना पक्ष आजही आमचा मित्रपक्ष असल्याचंही ते यावेळी म्हणाले आहेत.



### फडणवीसांच्या ऑफरवर उद्धव ठाकरेंचे दोन वाक्यात उत्तर

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेतच उद्धव ठाकरेंना सत्ताधारी बाकावर येण्याची ऑफर दिली. यावरून राज्यात तर्क वितर्क काढले जात असून फडणवीस यांनी 2029 चा उल्लेख केल्याने युतीचे संकेत मिळत आहेत. यावर आता उद्धव ठाकरे यांनी प्रतिक्रिया दिली असून त्यांनी, हा प्रश्न नुसता बाकाचा नाही तर प्रसंग बडा बाका आहे. सभागृहात काही गोष्टी खेळीमेळीने होतात. त्या खेळीमेळीने घ्यायला हव्यात, असे म्हटलं आहे.

# गणेशोत्सवासाठी एसटीच्या ५ हजार जादा बसेस

## कोकणात जाणाऱ्या प्रवाशांना दिलासा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : यंदा २७ ऑगस्ट रोजी गणरायाचे आगमन होत असून बाप्पाच्या स्वागतासाठी एसटी महामंडळ सज्ज झाले आहे. गणेशोत्सवासाठी एसटी महामंडळाने २३ ऑगस्ट ते ७ सप्टेंबरदरम्यान ५,००० जादा गाड्या सोडण्याचा निर्णय घेतला आहे, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

गणपती उत्सवानिमित्त जादा गाड्या सोडण्यासाठी मंत्रालयात आयोजित केलेल्या बैठकीत ते बोलत होते. या बैठकीला एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक



डॉ. माधव कुसेकर व एसटीचे सर्व खातेप्रमुख उपस्थित होते.

मंत्री सरनाईक म्हणाले की, गणपती उत्सव म्हणजे कोकणच्या चाकरमान्यांचा अत्यंत जिव्हाळ्याचा सण आहे. किंबहुना गणपती बाप्पा, कोकणचा चाकरमानी व एसटी यांचे एक अतूट नाते आहे. त्यामुळे दरवर्षी गणपती उत्सवानिमत्त कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांच्या सेवेसाठी नफ्या-तोट्याचा विचार न करता एसटी धावत असते. यंदा सुमार ५ हजार जादा गाड्या कोकणातील रस्त्यावर धावतील.

या बसेसचे आरक्षण npublic. msrtcors.com या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन प्रवाशांना करता येईल. या बसेसचे आरक्षण बसस्थानकावर किंवा महामंडळाच्या MSRTC Bus Reservation ॲपद्वारे, उपलब्ध होणार आहे. दरम्यान, नुकत्याच संपन्न झालेल्या आषाढी एकादशीच्या यात्रेसाठीदेखील एसटी महामंडळाने ५,२०० जादा बसेस सोडल्या होत्या. गणेशोत्सवादरम्यान एसटीची वाहतूक सुरळीत होण्यासाठी बसस्थानक व बसथांब्यावर एसटीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली कर्मचारी अहोरात्र कार्यरत राहणार आहेत. तसेच कोकणातील महामार्गावर ठिकठिकाणी वाहनदुरुस्ती पथक देखील तैनात करण्यात येणार आहे. २२ जुलैपासून गट आरक्षणाला सुरुवात, महिला व ज्येष्ठांना सवलत जादा बसेसमध्ये व्यक्तिगत आरक्षणाबरोबरच गट आरक्षणासाठी अमृत ज्येष्ठ नागरिकांना १०० टक्के, ज्येष्ठ नागरिकांना व महिलांना ५० टक्के तिकिट दरात सवलत दिली जाणार आहे. गट आरक्षण २२ जुलैपासून सुरू होत आहे. २३ ऑगस्ट पासून मुंबई, ठाणे, पालघर या विभागांतील प्रमुख बसस्थानकातून या जादा बसेस सोडण्यात येणार आहेत. गतवर्षी ४,३०० बसेस सोडण्यात आल्या होत्या.

## जीवनदीपच्या विद्यार्थ्यांना एनडीआरएफ तर्फे
# आपत्ती व्यवस्थापनाचे धडे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

गोवेली : आपत्ती ही कधीही उद्भवू शकते अशा अचानकपणे उद्भवणाऱ्या नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्तीवर मात करण्यासाठी, जीविताची हानी टाळण्यासाठी जीवनदीप महाविद्यालयात दिनांक १६-०७-२०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे व तहसीलदार कार्यालय कल्याण यांच्या संयुक्त विद्यमाने NDRF च्या जवानांनी विद्यार्थ्यांना आपत्कालीन परिस्थितीत करावयाचे प्राथमिक बचाव कार्य याबाबत प्रात्यक्षिक दिले. या कार्यशाळेची सुरुवात गणरायाच्या मूर्तीचे पूजन



करून, दीप प्रज्वलित करून करण्यात आली. जीवनदीप संस्थेचे अध्यक्ष रवींद्र घोडविंदे यांनी श्रीमती प्रीती घुडे (सर्कल ऑफिसर कल्याण) यांचे शाल व तुळशीचे रोप देऊन स्वागत केलं तसेच NDRF च्या जवानांचही स्वागत केलं.

अध्यक्षांनी विद्यार्थ्यांना सदर कार्यशाळेचा परिपूर्ण लाभ घ्या म्हणून आवाहन केलं.यानंतर NDRF च्या जवानांनी आपत्ती म्हणजे काय ,त्यापासून आपण कसा बचा करू शकतो,प्राथमिक कोणती पद्धती वापरून रुग्णावर प्रथमोपचार करता येतील.

उदा. रक्तस्त्राव थांबवणे, पट्टी बांधणे, रुग्णांना एका ठिकाणावरून दुसऱ्या ठिकाणी सुखरूप नेणे, स्ट्रेचर बनवणे, तसेच पूरस्थितीत वापरायचे काही साहित्य याची माहिती करून दिली. विद्यार्थ्यांनी देखील सदर कार्यशाळेत उत्स्फूर्त सहभाग घेतला.

श्री. प्रदीप माळी (मेजर), श्री. विक्रम सुतार ,श्री. गजानन पाथरीकर, श्री. बालाजी रणदिवे या सर्व NDRF च्या जवानांनी विद्यार्थ्यांना उत्तम प्रशिक्षण दिले. प्रा. सतीश लकडे यांनी सूत्रसंचलन व शेवटी सर्वांचे आभार व्यक्त करत सदर कार्यशाळा संपन्न झाली असे जाहीर केले.यावेळी प्राचार्य डॉ.अशोक वाघ, उपप्राचार्य हरेंद्र सोष्टे महाविद्यालयातील प्राध्यापक वर्ग विद्यार्थी यांच्या सर्वांच्या सहभागातून सदर कार्यशाळा यशस्वीरित्या संपन्न झाली.

# भिवंडी मनपामार्फत घरोघरी आरोग्य तपासणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या वैद्यकिय आरोग्य विभागांतर्गत असलेल्या

1) भाग्यनगर आरोग्य केंद्र
2) नदीनाका आरोग्य केंद्र
3) पिसपार्क आरोग्य वर्धीनी केंद्र
4) स्व. टावरे स्टेडियम

या ठिकाणी दिनांक 16/07/2025 रोजी सकाळी 10.00 ते 02.00 या वेळेत मा. प्रशासक तथा आयुक्त श्री. अनमोल सागर (भा.प्र.से.) यांनी वैद्यकीय आरोग्य अधिकारी श्री. संदिप गाडेकर व शहर अभियंता श्री. जमील पटेल यांचेसमवेत भेट दिली. या भेटीदरम्यान आयुक्तांनी आरोग्य केंद्रावर पुरविण्यात येणाऱ्या सेवा,



सुविधा व कामाकाजाचा आढावा घेवून विविध सुचना दिल्या.

1) वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांच्या मार्गर्शक सुचनेनुसार वैद्यकीय अधिकारी यांनी त्यांचे आरोग्य केंद्रातील ए.एन.एम., फार्मासिस्ट, आशा वर्कर व इतर आरोग्य कर्मचा-यांची दर पंधरा दिवसात बैठक घेऊन त्यांच्या कामाचा आढावा घ्यावा.

2) रजिस्टर व रिपोर्टींग यांचे सुसुत्रीकरण करून अद्यावत ठेवणे.

3) ई-औषधींचा उपयोग करून प्रत्येक आरोग्य वर्धीनी केंद्रामध्ये ई-औषधी साठा दरवेळेस अद्ययावत करणेत यावा व त्या नुसार औषधांची मागणी करण्यात यावी.

4) तसेच नागरी आरोग्य केंद्रांनी आपल्या कार्यक्षेत्रामध्ये एन.सी. डी. स्क्रीनिंग कॅम्प आठवडयात किंवा पंधरा दिवासांत आयोजीत करणेत यावा.

5) आरोग्य वर्धीनी केंद्रातील वैद्यकिय अधिकारी यांनी दररोज ओ.पी.डी. संपल्यावर आपल्या कार्यक्षेत्रातील 10 ते 15 घरांना भेट देवून आरोग्य तपासणी करावी.

6) बांधकाम विभागास आरोग्य केंद्रांच्या नुतनीकरणाबाबत सुचना देण्यात आल्या.

आरोग्य वर्धीनी केंद्रांची वेळ सकाळी 09.00 ते 05.00 व आपला दवाखाना यांची दुपारी 02.00 ते 10.00 या वेळेत निश्चित करणेत आलेली आहे. तरी नागरीकांनी याचा लाभ घ्यावा असे अहवान मा. आयुक्तांनी केले आहे.

# कल्याण बाजार समितीच्या नवनिर्वाचित संचालक मंडळाने केली मार्केटची पाहणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



टिटवाळा : कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीचे नवीन संचालक मंडळ यांनी बाजार समितीतील फुलं मार्केट, भाजी मार्केट कांदे-बटाटा मार्केट .धान्य मार्केट परिसराची पाहणी केली व व्यापाऱ्यांच्या समस्या जाणुन घेतल्या व संबंधीत अधिकारी यांना समस्या बाबत सुचना दिल्या.

यावेळी सभापती रवींद्र घोडविंदे, उपसभापती जालंदर पाटील, संचालक वसंत लोणे,रवींद्र भोईर, नरेश सुरोशी, किशोर वाडेकर, योगेश धुमाळ, शंकर आव्हाड, भाऊ गोंधळे,कपील थळे, अरूण पाटील, गिरिश पाटील,मनोहर पाटील रवींद्र आव्हाड ,विजय सुरोशी ,काशिनाथ नरवडे,यांच्या सह आदी उपस्थित होते.

संचालक मंडळांनी सर्व मार्केटची पाहणी केली, व्यापाऱ्यांनी भाजीपाला, कांदे बटाटा खराब झालेली रस्त्यावर बाहेर फेकून देवू ,तसेच आपला माल प्रत्येकाने स्वाताच्या गाळया मध्ये ठेवावे , जर सुचनांचे पालन नाही केल्यास कारवाई केली जाईल, तसेच यावेळी फुलमार्केट नवीन बिल्डिंगचे काम सुरु आहे त्याची पाहणी करून व संबंधित अधिकारी यांना लवकरात लवकर बांधकाम पूर्ण करण्यासाठी सुचना दिल्या.यावेळी व्यापारी वर्ग यांनी त्यांच्या समस्या सांगितल्या आम्हाला पाण्याचा व्यवस्था, शौचालय व्यवस्था करावी असे सांगितले.







# गीतासार



### अध्याय १६
### दैवासुरसम्पद्विभागयोगः

यः शास्त्रविधिमुत्सृज्य वर्तते कामकारतः । न स सिद्धिमवाप्नोति न सुखं न परां गतिम् ॥ १६-२३ ॥

जो मनुष्य शास्त्राचे नियम सोडून स्वतःच्या मनाला वाटेल तसे वागतो, त्याला सिद्धी मिळत नाही, परम गती मिळत नाही आणि सुखही मिळत नाही. ॥ १६-२३ ॥

ॐ तत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे दैवासुरसंपद्विभागयोगो नाम षोडशोऽध्यायः ॥१६॥

ॐ हे परमसत्य आहे. याप्रमाणे श्रीमद्भगवद्गीतारूपी उपनिषद तथा ब्रह्मविद्या आणि योगशास्त्राविषयी श्रीकृष्ण आणि अर्जुन यांच्या संवादातील दैवासुरसम्पद्विभागयोगः नावाचा हा सोळावा अध्याय समाप्त झाला. ॥ १६ ॥

# मिरा-भाईंदर विधानसभा मतदारसंघातील प्रश्नांसंदर्भात आढावा बैठक



**मिरा भाईंदर शहरातील मुख्य रस्ता सिमेंट काँक्रीटचा करावा - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : मेट्रो लाईन समवेत असणारे काशिगाव मेट्रो स्थानक ते काशिमिरा नाक्यापर्यंत तसेच मिरागाव ते काशिगाव मेट्रो स्थानकापर्यंतचे वाया आकाराचे पूल मुख्य पुलला जोडण्याच्या कामास गती देण्यात यावी. तसेच मिरा भाईंदर शहरातील मुख्य रस्ता, काशिमिरा नाका ते रेल्वे फाटक पर्यंतचा रस्ता सिमेंट काँक्रीटचे करावेत, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

विधानभवन येथे मिरा भाईंदर विधानसभा मतदारसंघातील प्रश्नांसंदर्भात आयोजित बैठकीत मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते. यावेळी नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, मिरा भाईंदर विधानसभा मतदारसंघाचे आमदार नरेंद्र मेहता, मुख्यमंत्र्यांचे सचिव श्रीकर परदेशी, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे अपर मुख्य सचिव असीमकुमार गुप्ता, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, प्रधान सचिव नगरविकास विभाग डॉ. के. एच. गोविंदराज, एमएमआरडीए चे महानगर आयुक्त डॉ.संजय मुखर्जी, उद्योग विभागाचे सचिव पी. अनबलगन, अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या प्रधान सचिव विनिता सिंगल, ऊर्जा विभागाच्या सचिव आभा शुक्ला, मिरा भाईंदर महानगरपालिका आयुक्त राधाबिनोद अरिबम शर्मा उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, मिरारोड परिसरातील वाढती लोकसंख्या विचारात घेता या ठिकाणी नवीन शिधावाटप कार्यालय करण्यात येईल तसेच उपनिबंधक कार्यालयाच्या निर्मितीसाठी ३५ पदांच्या निर्मितीचा प्रस्ताव पाठवण्यात यावा. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अंतर्गत असणाऱ्या जागांच्या आरक्षणाची यादी तयार करावी. शाळांकरिता किंवा अन्य कोणत्या प्रयोजनासाठी आरक्षित ठेवलेल्या जागा अन्य कोणत्याही कारणासाठी वापरता येणार नाहीत अशी जागा वापरात येत असेल तर तत्काळ काम थांबवावे अशा सूचना मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी यावेळी दिल्या.

यावेळी भाईंदर- दहिसर लिंक रोड, भाईंदर पूर्व जैसलपार्क- घोडबंदर रस्ता, सूर्या धरणातून मीरा-भाईंदर शहराची पाणीपुरवठा योजनेची कामे, मीरा-भाईंदर शहरात प्रस्तावित क्लस्टरचे आराखडे, धोकादायक इमारतींच्या पुनर्विकासाकरता सवलती, एसटी महामंडळाची पडीक जागा मीरा-भाईंदर पालिकेच्या परिवहन विभागासाठी देणे आदी प्रश्नांबाबत सविस्तर आढावा घेण्यात आला.

# रायगड जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुक प्रभाग रचना जाहीर

**२१ जुलै २०२५ पर्यंत हरकती सादर करण्याचे आवाहन**

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, 1961 (सन 1962 चा अधिनियम क्र. 5) अंतर्गत रायगड जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीसाठी निवडणूक विभाग व प्रारूप प्रभाग रचना जाहीर करण्यात आली आहे. ही रचना जिल्हाधिकारी रायगड यांच्याकडून सादर करण्यात आलेल्या आदेशाच्या आधारे महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात (दिनांक 14 जुलै 2025) प्रसिद्ध झाली आहे.

या प्रारूप आदेशाच्या प्रती पुढील ठिकाणी प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत.जिल्हाधिकारी कार्यालयातील फलकावर, जिल्हा परिषद कार्यालयातील फलकावर, रायगड जिल्ह्यातील सर्व तहसिलदार व पंचायत समिती कार्यालयांच्या सूचना फलकांवर (पनवेल, कर्जत, खालापूर, सुधागड, पेण, उरण, अलिबाग, मुरुड, रोहा, तळा, माणगाव, म्हसळा, श्रीवर्धन, महाड, पोलादपूर)

राज्य शासन अथवा प्राधिकृत अधिकारी (जिल्हाधिकारी रायगड) यांच्याकडून सदर प्रारूप रचनेवर 14 जुलै 2025 नंतर विचार करण्यात येणार आहे.

या संदर्भात कोणालाही हरकत अथवा सूचना असल्यास, ती लेखी स्वरूपात, कारणांसह संबंधित तहसीलदार यांच्याकडे दिनांक 21 जुलै 2025 पर्यंत सादर करावी, असे स्पष्ट करण्यात आले आहे. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या हरकती किंवा सूचना विचारात घेतल्या जाणार नाहीत, असे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी कळविले आहे.

# कल्याण तालुक्यातील ४१ ग्रामपंचायतींचे सरपंच आरक्षण जाहीर



**पुढील ५ वर्षासाठी सरपंच सोडत**

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : राजकारणाचा श्रीगणेशा समजल्या जाणार्या ग्रामपंचायतीच्या निवडणुका देखील चांगल्याच चुरशीच्या होऊ लागल्या आहेत. ग्रामपंचायतीत सरपंच होण्याचा मान कोणाला मिळणार याकडे डोळे लावून बसलेल्या कल्याण तालुक्यातील ग्रामपंचायतीच्या निवडणुका लढविण्यास इच्छुक असलेल्या नागरिकांनी गर्दी केली होती. मंगळवारी प्रांताधिकारी विश्वास गुजर यांच्या अध्यक्षतेखाली कल्याण पंचायत समितीच्या सभागृहात सोडत काढण्यात आली. यावेळी तहसीलदार सचिन शेजाळ, नायब तहसीलदार सत्यजीत चव्हाण, गटविकास अधिकारी संजय भोय तसेच ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच, सदस्य व प्रत्येक ग्रामपंचायतीमधून काही इच्छुकांनी हजेरी लावली होती.

कल्याण तालुक्यातील ४१ ग्रामपंचायतीची सोडत पार पडली. चिठ्ठ्या टाकून काढण्यात आलेल्या या सोडतीत शासनाच्या निकषानुसार अनुसूचित जाती, जमाती आणि नागरिकांचा मागास प्रवर्ग यासाठी आरक्षित ग्रामपंचायतीची लोकसंख्येच्या निकषानुसार निवड करण्यात आली. यामध्ये तीन ग्रामपंचायती अनुसूचित जाती साठी राखीव आहेत त्या मध्ये आणे-भिसोळ आणि कांबा अनुसूचित महिला, वासुद्री-अनुसुचित जाती. तसेच अनुसचित जमातीसाठी ग्रामपंचायत जांभूळ-मोहिली अनुसूचित जमाती महिला, वाहोली-अनुसूचित जमाती महिला, काकडपाडा-अनुसुचित जमातीसाठी आहे.

नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला ग्रामपंचायत- दहिवली, निंबवली, वरप, पळसोली, दहागांव, नागरिकांचा मागास प्रवर्ग - चवरे, उशिद आराळे, केळणी कोलम, म्हसकळ अनखर, रुंदे आंबिवली, वसत शेलवली, सर्वसाधारण महिला ग्रामपंचायत आपटी मांजर्ली, गेरसे, गुरुवली, घोटसई, कोसले, मामणोली, म्हारळ, नडगाव दानबाव, नांदप, राया ओझर्ली, रायते पिंपळोली, वेहळे. तर सर्वसाधारण ग्रामपंचायतसाठी बापसई, बेहेरे, फळेगाव, कुंदे, खोणी वडवली, मानिवली, गोवेली रेवती, पोई, रोहण अंताडे, सांगोडे, उतने चिंचवली, वडवली-शिरढोण या ग्रामपंचायतीची आरक्षण सोडत काढण्यात आली असल्याची माहिती तहसीलदार सचिन शेजाळ यांनी दिली.

# डॉ. दीपक टिळक यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची श्रद्धांजली

**लोकाभिमुख सामाजिक संस्थाचा आधारस्तंभ हरपला**

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : 'लोकमान्य टिळक यांचा महाराष्ट्रातील समाजकारणातील विविधांगी क्षेत्रातील वारसा समर्थपणे चालविणारे लोकाभिमुख, मार्गदर्शक असे व्यक्तिमत्व डॉ. दीपक टिळक यांच्या निधनामुळे अनेक सामाजिक संस्थांचा आधारस्तंभ हरपला आहे,' अशा शोकभावना व्यक्त करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लोकमान्य टिळक यांचे पणतू, दैनिक केसरीचे विश्वस्त, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलपती डॉ. दीपक जयंत टिळक यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.

शोकसंदेशात मुख्यमंत्री म्हणतात, लोकमान्य टिळक आणि त्यांचे नातू दिवंगत जयंत टिळक यांच्याकडून मिळालेला वारसा डॉ. दीपक टिळक यांनी समर्थपणे चालविला. ते राजकारणात फारसे रमले नाहीत. पण लोकमान्य टिळक यांनी पाया घातलेल्या दैनिक केसरी तसेच शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रातील कार्य त्यांनी तितक्याच जबाबदारीने सांभाळले. यातून ते कित्येक सामाजिक संस्था, संघटना, विश्वस्त मंडळांचे आधारस्तंभ ठरले. त्यांच्या पुढाकाराने अनेक सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि क्रीडा क्षेत्रातील उपक्रमांना समाजातून पाठबळ मिळत राहिले. डॉ. टिळक हे व्यवस्थापन आणि पत्रकारिता क्षेत्रातील अभ्यासक, संशोधक राहिले आहेत. त्यांच्या मार्गदर्शनामुळे अनेक होतकरू युवकांनाही या क्षेत्रातील संशोधनाची प्रेरणा मिळाली. टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या माध्यमातून त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात भरीव असे कार्य केले आहे. डॉ. दीपक टिळक यांच्या निधनामुळे राज्याच्या सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्रातील एक मार्गदर्शक असे उत्तुंग व्यक्तिमत्व हरपले आहे. ही या क्षेत्रासाठी हानी आहे. डॉ. टिळक यांच्या निधनामुळे त्यांच्या परिवारावर, विविध संस्था, संघटना आणि सामाजिक उपक्रमांशी निगडित कार्यकर्ते यांच्यावर दुःखाचा आघात झाला आहे. या सर्वांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. त्यांना हे दुःख सहन करण्याची ताकद मिळो, अशी ईश्वराला प्रार्थना करतो. डॉ. दीपक टिळक यांच्या आत्म्यास सद्गती लाभो, अशी प्रार्थना करतो आणि त्यांना विनम्र श्रद्धांजली अर्पण करतो, असे मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रदेश सचिव पदी रविंद्र परटोले!

**(ठाणे ग्रामीण जिल्ह्यातून नव नेतृत्वाला संधी)**



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर ग्रामीण(नरेंद्र पाटील) : शहापूर तालुक्यातील वासिंद जवळील अंबर्जे गावचे भूमिपुत्र व सामाजिक कार्यकर्ते,युवा नेते म्हणून परिचित असलेले रविंद्र कृष्णा परटोले यांची राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रदेश सचिव पदी नियुक्ती करण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार व प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांच्या शुभहस्ते रविंद्र परटोले यांना सचिव पदाचे नियुक्तीपत्र देण्यात आले असून ठाणे ग्रामीण जिल्ह्यातील नविन नेतृत्वाला प्रदेश सचिव पदाची संधी दिल्याबद्दल सर्वत्र रविंद्र परटोले यांचे कौतुक होत आहे.

रविंद्र परटोले हे यापूर्वी काँग्रेस पक्षात काम करत होते काँग्रेस पक्षात असताना त्यांनी प्रदेश ओबीसी विभागाचे कार्यालयीन सरचिटणीस म्हणून काम केले होते, प्रांतिक सदस्यपदी ते शहापूर ब्लॉकमधून निवडून गेले होते तसेच ठाणे जिल्हा ग्रामीण काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस म्हणून ते कार्यरत होते. विधानसभा निवडणुकीच्या नंतर त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता. त्यांनी आतापर्यंत केलेल्या राजकीय कामाचा अनुभव लक्षात घेता, प्रदेश उपाध्यक्ष प्रमोद हिंदुराव, मुख्य प्रवक्ते आनंद परांजपे, आमदार दौलत दरोडा, ठाणे ग्रामीण जिल्हा अध्यक्ष भरतभाऊ गोंधळे यांच्या शिफारसीनुसार नव नेतृत्वाला संधी देण्यासाठी त्यांची प्रदेश सचिव या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे.

# आरोग्य

## आल्याचा तुकडा खा आरोग्य समस्या दूर करा



आल्यामध्ये औषधी गुणधर्म भरपूर असतात. त्यात अँटी-बॅक्टेरियल, अँटी-इंफ्लेमेटरी आणि अँटीऑक्सिडंट्स असतात. त्यात जीवनसत्त्वे आणि खनिजे देखील मोठ्या प्रमाणात आढळतात. आल्यामध्ये मँगनीज, फॉस्फरस, मॅग्नेशियम, सोडियम आणि कॅल्शियमसह अनेक पोषक घटक असतात, जे शरीर निरोगी ठेवण्यास मदत करतात. आले खाल्ल्याने शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढते आणि अनेक रोगांपासून बचाव होतो. आले सर्दी आणि हंगामी आजार बरे करण्यास मदत करते. म्हणून तुम्ही पावसाळ्यात आल्याचे सेवन केले पाहिजे. पावसाळ्यात दररोज सकाळी आल्याचा तुकडा खाल्ल्याने अनेक आरोग्य समस्या दूर होऊ शकतात.

**हृदयाच्या आरोग्यासाठी फायदेशीर**

पावसाळ्यात हृदयाचे आरोग्य सुधारण्यासाठी, तुम्ही आल्याचे सेवन केले पाहिजे. आल्यामध्ये अँटीऑक्सिडंट गुणधर्म असतात, जे रक्तातील साखर नियंत्रित करतात. आल्याचे सेवन केल्याने कोलेस्टेरॉलची पातळी देखील कमी होते. यामुळे हृदयाचे आरोग्य सुधारते आणि बीपी नियंत्रणात राहते.

**सांधेदुखी कमी होते**

पावसाळ्यात सांधे आणि गुडघेदुखी वाढते. अशा परिस्थितीत आल्याचे सेवन फायदेशीर ठरू शकते. आल्याचे सेवन केल्याने संधिवाताच्या वेदनांपासूनही आराम मिळतो.

**पचन सुधार**

पावसाळ्यात पचनशक्ती कमकुवत होते. यामुळे गॅस, ॲसिडिटी, अपचन आणि बद्धकोष्ठता यासारख्या समस्या उद्भवतात. अशा परिस्थितीत तुम्ही दररोज सकाळी आल्याचा एक तुकडा खाऊ शकता. यामुळे पचनाशी संबंधित समस्या दूर होतील. पोटाची सूज देखील कमी होईल.

# कल्याण पूर्वेतील दोन रस्त्यांसाठी २०१ कोटींचा निधी

## एमएमआरडीएकडून प्रशासकीय प्रस्तावाला मान्यता



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली(शरद शहाणे) : कल्याण पूर्वेच्या दोन रस्त्यांना एम एम आर डी ए , कडून 201 कोटीच्या प्रस्तावाला प्रशासकीय मान्यता मिळाली आहे.

कल्याण पूर्वेला आणि कल्याण ग्रामीण मध्ये या दोन्ही मतदारसंघां मध्ये मलंग रोड चेतना शाळेपासून ते नेवाळी नाक्यापर्यंत जो हा जो रस्ता आहे त्याचे सिमेंट सिमेंट काँक्रिटीकरण व्हावे याची गेल्या अनेक वर्षापासून मागणी होत होती, एमएमआरडीएने 176 कोटीच्या प्रस्तावाला प्रशासकीय मान्यता दिली.

त्याचप्रमाणे काटे मानिवली ते सिद्धार्थनगर तिसगाव नका हा सर्वात महत्त्वाचा यु टाईप हा अत्यंत महत्त्वाचा रस्ता आहे जेणेकरून कल्याण पूर्वेचे ट्रॅफिक ची समस्या पूर्णपणे संपून जाईल त्यासाठी गेल्या अनेक वर्षापासून या रस्त्याचे सिमेंट काँक्रीट करण करण्याची मागणी होती या रस्त्याला सुद्धा एमएमआरडी कडून 76 कोटीच्या प्रस्तावाला प्रशासकीय मान्यता मिळाली या दोन्ही महत्त्वाच्या रस्त्यांचा 201 कोटीचा प्रस्ताव होता त्याला एमएमआरडीएने प्रशासकीय मान्यता दिली . लवकरच टेंडर निघून कामाला सुरुवात होईल.

हा कल्याण पूर्वी साठी महत्त्वाचा विषय होता. यासाठी खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आभार मानले

त्याचप्रमाणे मेट्रो 12 चे काम वेगाने चालू आहे. असे खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे यांनी डोंबिवलीत पत्रकारांशी बोलताना सांगितले.

# हि दोस्ती तुटायची नाय ! मैत्री असावी तर अशी !

## आजारी मित्राची हॉस्पिटलमध्ये भेट घेऊन जॉनी लिव्हरने दिला सामाजिक संदेश



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : आपल्या हास्याने सर्व प्रेक्षकांचे मनोरंजन करणारे डी महेश ट्रिपल वेसल डीसीज या आजाराने त्रस्त असल्यामुळे उपचारासाठी सिद्धिविनायक हॉस्पिटल, ठाणे येथे दाखल झाले होते. बॉलीवुडचे सुप्रसिद्ध विनोदी अभिनेते हस्यसम्राट जॉनी लिव्हर यांनी दि.15 जुलै 2025 रोजी सिद्धिविनायक हॉस्पिटल येथे येऊन डी महेश यांची विचारपूस करून डॉक्टरांचे देखील आभार मानले.

डी महेश यांच्यावर केलेली शस्त्रक्रिया ही फार गुंतागुंतीची होती. परंतु डॉक्टर अमोल गीते यांच्या सिद्धिविनायक हॉस्पिटलमध्ये त्यांच्या सर्व डॉक्टरांच्या साह्याने सदरची शस्त्रक्रिया यशस्वी पार पाडली. तसेच पाच लाख रुपये खर्चाची सदरची शस्त्रक्रिया महात्मा ज्योतिबा फुले योजनेतून विनामूल्य केली. त्यांची ही बायपास सर्जरी यशस्वी झाली त्यामुळे जॉनी लिव्हर यांनी डॉक्टर अमोल गीते यांच्या सर्व टीमचे आभार मानले.

यावेळी महेश यांची चौकशी करताना तू अगदी ठणठणीत दिसत आहेस असे कौतुकास्पद उद्गार देखील जॉनी लिव्हर यांनी काढले. प्रत्यक्ष भेटायला आलेले पाहून महेश देखील गहिवरले आणि त्यांनी जॉनी लिव्हर यांना मिठी देखील मारली. सदरची शस्त्रक्रिया अत्यंत जठील होती. सुर्दैवाने ती यशस्वी पार पडली. ही शस्त्रक्रिया करताना महेश वाचतील की नाही असा प्रश्न समोर होता. परंतु आम्ही आमच्या प्रयत्नाने ती सर्जरी यशस्वी केली. महेश यांना शस्त्रक्रियेच्या सहावा दिवशी डिस्चार्ज देण्यात आले असे डॉक्टर गीते यांनी सांगितले.

# आजचे राशि भविष्य



**मेष**
अध्यात्मावरील विश्वास तुमच्यामध्ये शांती आणि सकारात्मक उर्जा प्रसारित करतो.जीवनाला सकारात्मक दृष्टीकोनातून समजून घेण्याचा प्रयत्न करीत आहात.

**वृषभ**
जी एक मोठी कामगिरी आहे.कोणावरही विश्वास ठेवू नका. अभ्यासाकडे लक्ष न देता विद्यार्थ्यांनी भटकण्यात बहूमुल्य वेळ वाया घालवू नये.

**मिथुन**
सभोवतालचे लोक कदाचित तुमच्याबद्दल गैरसमज बाळगू शकतात, म्हणून आपले विचार स्पष्टपणे व्यक्त करा. जे काही बोलता ते विचारपूर्वक बोला.

**कर्क**
गैरसमज झाला तर त्रास होऊ शकतो.घर खरेदी करण्याचा निर्णय घेऊ शकता. बऱ्याच काळापासून घर खरेदीचा विचार करत आहात आता ती वेळ आली आहे.

**सिंह**
योग्य विचार करून पुढे जा. जबाबदाऱ्यांकडे लक्ष देऊ शकणार नाही. आपले मन मित्रांकडे केंद्रित राहील. बहुतेक वेळ त्यांना संदेश पाठविण्यात किंवा त्यांच्याशी

**कन्या**
फोनवर बोलण्यात घालवाल.वैवाहिक जीवनात काही काळ एखाद्या गोष्टीविषयी तणाव असू शकतो. तेथे पदोन्नती आणि इच्छित स्थानांतरण असेल.

**तूळ**
मुख्यतः निरोगी राहण्याची शक्यता असते. धार्मिक कार्यात आपली रुची वाढेल आणि आपण धार्मिक स्थळांवर फिराल. बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

**वृश्चिक**
क्षेत्रात मंदी आणि उपलब्धतेचा अभाव असेल. सामंजस्यामुळे घरात आनंदी वातावरण असेल. परस्पर विचारांची देवाणघेवाण बदल घडवून आणू शकते.

**धनु**
मुलांवर काटेकोर नियंत्रण न ठेवता, आज त्यांना स्वतःनुसार दिवस घालवण्याचे स्वातंत्र्य देखील द्या. निर्णय अधिक प्रभावी करण्यासाठी आपला भाग्यांक वापरा.

**मकर**
एखादी दुर्घटना घडू शकते, आपल्या स्नायू किंवा सांधे संबंधित काही समस्या असू शकतात, म्हणून हलका व्यायाम करा.दुचाकीस्वार हेल्मेटचा वापर करा.

**कुंभ**
मित्राशी मतभेद असू शकतात. कोणावरही विश्वास ठेवू नका. नवीन संबंध तयार होऊ शकतात. वैवाहिक जीवन आनंदी असेल. व्यवसाय वाढविण्यास सक्षम असाल.

**मीन**
आर्थिक फायदा आणि सन्मान वाढेल. आरोग्य चांगले राहील. अचानक प्रिय व्यक्तीबरोबर होऊन तुमचा आनंद वाढेल.रागामुळे वातावरण थोडे गडबड होऊ शकते.

जीवनदीप महाविद्यालय गोवेली ता. कल्याण
मुंबई विद्यापीठाशी संलग्न, नॅक मूल्यांकन प्राप्त
प्रवेश सुरू (२०२५•२६)
पदवी नंतर पत्रकारितेत करिअर करण्याची सुवर्णसंधी
एम.ए (एमसीजे)
(मास्टर ऑफ जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन)
-पात्रता-
कोणत्या शाखेतून पदवी उत्तीर्ण
- करिअर व्यवसाय व नोकरीची संधी -
टीव्ही चॅनेल्स, वृत्तपत्र, मॅग्झिन, रेडिओ, वेब मीडिया, जनसंपर्क, जाहिरात, चित्रपट निर्मिती, डिजिटल मीडिया या क्षेत्रांमध्ये संधी.
- प्रवेशासाठी संपर्क -
९४२१०५९३९६
goveli_jssp@rediffmail.com
www.jeevandeepcollegegoveli.in

जीवनदीप शैक्षणिक संस्था, पोई संचलित
जीवनदीप महाविद्यालय, गोवेली
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गोवेली
मुंबई विद्यापीठाशी कायम संलग्न, नॅक मुल्यांकन (B- Grade) प्राप्त
११ वी व १२ वी
कला, वाणिज्य, विज्ञान (IT / CS)
UNDER GRADUATION: B.Sc Data Science, B.Sc IT, B.Sc Chemistry Maths, BMS, BAF, B.Com, BAMMC, B.A.
POST GRADUATION: M.Sc IT, M.Sc Chemistry, M.Com Advanced Accountancy, MAMMC, M.A. Marathi, M.A. Economics, M.A. History, M.A. Sociology, M.A. Geography
Admission Open 2025-2026
आपलं कॉलेज हक्काचं कॉलेज
आजच आपला प्रवेश निश्चित करा!
7775851123, 8108559566
9619188558

# सागरी शिखर परिषद २०२५ ला उत्स्फूर्त प्रतिसाद

## वाढवण बंदरामुळे भारत होणार सागरी महासत्ता - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : वाढवण बंदराच्या उभारणीमुळे महाराष्ट्र आणि भारत सागरी महासत्ता होण्याच्या दिशेने वेगाने वाटचाल करीत असून, हा प्रकल्प केवळ बंदर नव्हे तर एक आर्थिक क्रांती घडवून आणणारा केंद्रबिंदू ठरेल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

राज्य शासनाच्या मत्स्य व्यवसाय व बंदरे विभाग आणि महाराष्ट्र सागरी मंडळाच्या वतीने आयोजित सागरी शिखर परिषद २०२५ चे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसयांच्या हस्ते करण्यात आले.
मुंबईमध्ये झालेल्या या कार्यक्रमास मत्स्य व्यवसाय व बंदर विकास मंत्री नितेश राणे, परिवहन व बंदरे विकास विभागाचे अपर मुख्य सचिव संजय शेठी, पर्यटन विभागाचे प्रधान सचिव अतुल पाटणे, उद्योग विभागाचे सचिव पी अंबलगन, महाराष्ट्र सागरी मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीप पी., जवाहरलाल नेहरू पोर्ट अथॉरिटीचे अध्यक्ष उमेश वाघ आदी उपस्थित होते.

**'भारत मेरीटाइम व्हिजन २०३०' आणि 'अमृतकाल मेरीटाइम व्हिजन २०४७' मध्ये महाराष्ट्राचा सहभाग**

केंद्र शासनाच्या मेरीटाइम व्हिजनचा उल्लेख करत मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, भविष्यात भारत हा जागतिक सप्लाय चेनमधला एक मोठा खेळाडू बनू शकतो. म्हणूनच केंद्र सरकारने 'इंडिया मेरीटाईम व्हिजन २०३०' आणि 'अमृतकाल मेरीटाईम व्हिजन २०४७' तयार केले आहेत. या दोन्ही व्हिजनचा अभ्यास करून, महाराष्ट्रासाठी एक मजबूत मेरीटाईम व्हिजन तयार करण्याचे आपले उद्दिष्ट आहे. या धोरणासाठी आजच्या चर्चासत्रातील सर्व शिफारशी संकलित करून आम्ही त्या अमलात आणू.

मुंबई ही आपली आर्थिक, व्यावसायिक, मनोरंजन आणि आर्थिक राजधानी आहे. मुंबईला भारताचं आर्थिक इंजिन बनवणारं कारण म्हणजे मुंबई पोर्ट आणि जेएनपीटी पोर्ट ही बंदरे आहेत. ही दोन बंदरे मुंबईला आघाडीवर घेऊन आली. आता आपण जागतिक सप्लाय चेनमध्ये शक्ती बनण्याचा संकल्प करत आहोत, त्यामुळे बंदरांची क्षमता, कार्यक्षमता आणि कनेक्टिव्हिटी वाढवावी लागेल, असेही त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, सुप्रीम कोर्टाच्या निर्णयामुळे वाढवण बंदर होणार नव्हते. पण केंद्रात नरेंद्र मोदी आणि महाराष्ट्रात आमचे सरकार आल्यावर पुन्हा नव्याने प्रयत्न हाती घेण्यात आले. प्रारंभी प्रकल्प १००% महा पोर्टकडे होता, परंतु त्याचा व्याप पाहता केंद्र सरकारला प्रमुख भागीदार करण्यात आले.
वाढवण बंदर पूर्ण क्षमतेने कार्यरत झाल्यानंतर जगातील पहिल्या दहा बंदरांमध्ये स्थान मिळवेल. भारत सध्या जगातील तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था होण्याच्या मार्गावर आहे आणि महाराष्ट्र हे नेतृत्व करण्यास तयार आहे," असेही त्यांनी यावेळी सांगितले.

**ऑफशोअर विमानतळ आणि मल्टिमोडल कनेक्टिव्हिटी**

भारताचे पहिले 'ऑफशोअर विमानतळ' वाढवण बंदराशेजारी उभारले जात आहे. यामुळे जलमार्ग, रेल्वे, रस्ता आणि हवाई मार्गांची मल्टिमोडल जोडणी मिळेल. यासाठी सागरमाला प्रकल्पांतर्गत केंद्र सरकारकडून मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक केली जात आहे. महाराष्ट्रात जलवाहतूक, शिपबिल्डिंग आणि शिप रीसायकलिंगसाठी मोठी संधी आहे," असे मुख्यमंत्री श्री फडणवीस म्हणाले.

आम्ही वाढवण बंदराला जोडणारे रेल्वे जाळे तयार करण्याचाही प्रयत्न करत आहोत. सागरमाला प्रकल्पामुळे ही कनेक्टिव्हिटी खूपच सोपी झाली आहे. वाढवण पोर्टवर मल्टी-मोडल कार्गो हाताळणी क्षमता निर्माण होईल. आम्ही आमची नॉन-मेजर पोर्ट्सही अधिक कार्यक्षम बनवण्याचा प्रयत्न करत आहोत कारण त्यांचेही महत्त्वाचं योगदान आहे. भविष्यात आपण केवळ कार्गो हाताळणीपुरते मर्यादित राहणार नाही, तर शिपबिल्डिंग, शिप रीसायकलिंग, वॉटर ट्रान्सपोर्टच्या दिशेने जाऊ शकतो. महाराष्ट्रात विशेषतः मुंबई-नवी मुंबई भागात जलवाहतुकीची खूप मोठी संधी आहे. यामुळे नागरिकांचा जीवनमान खूप सुकर होऊ शकतो, असे श्री. फडणवीस यांनी सांगितले.

**समृद्धी महामार्गामुळे जलद मालवाहतूक आणि २४ जिल्ह्यांचा थेट लाभ**

मुख्यमंत्री श्री फडणवीस म्हणाले की, समृद्धी महामार्गामुळे सुमारे १५-१६ जिल्ह्यांना जेएनपीटी बंदराशी जलद जोडणी मिळाली असून, जिथे माल पोहोचण्यासाठी ६-७ दिवस लागत होते, तिथे आता तो प्रवास १० तासांपेक्षा कमी वेळेत होतो. वाढवण बंदरालाही 'ऍक्सेस कंट्रोल्ड' रस्त्यांद्वारे समृद्धी महामार्गाशी जोडण्यात येत आहे, ज्यामुळे २४ जिल्ह्यांना थेट बंदर कनेक्टिव्हिटी मिळणार आहे.
कोकणातील पारंपरिक बंदरांचा इतिहास सांगून मुख्यमंत्री श्री फडणवीस म्हणाले की, कोकणातील काही बंदरे ५००-६०० वर्षांपूर्वी आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी प्रसिद्ध होती. त्या गौरवशाली इतिहासाला पुन्हा उजाळा देत आहोत. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे आणि ती बंदरांमुळे आर्थिक इंजिन झाली आहे.

**महाराष्ट्राला मेरीटाईम क्षेत्रात आघाडीवर नेणारे पाऊल - नितेश राणे**

यावेळी मंत्री नितेश राणे म्हणाले की, मेरिटाईम समिट हे शिखर संमेलन केवळ एक कार्यक्रम नाही, तर महाराष्ट्राला भारताच्या मेरीटाईम क्षेत्रात आघाडीच्या स्थानी नेण्यासाठी घेतलेले एक महत्त्वाचे पाऊल आहे.

पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाखाली, जागतिक मेरीटाईम हब होण्याच्या दिशेने वेगाने वाटचाल करत आहे. राज्यातही मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या गतिशील नेतृत्वामुळे महाराष्ट्राच्या समुद्रकिनारपट्टी आणि मेरीटाईम क्षमतेचा जास्तीत जास्त उपयोग करण्याची दिशा मिळाली आहे. त्यांनी महाराष्ट्राच्या सागरी किनारपट्टीचा वापर करत बंदराधिष्ठित विकास, सागरी उत्पादन आणि किनारपट्टी वाहतुकीस चालना दिली आहे.
महाराष्ट्र हे भारताच्या आर्थिक प्रगतीचे इंजिन आहे. अरबी समुद्र ही केवळ आपली भौगोलिक सीमा नाही, तर ती एक संधीने भरलेली दुवा आहे, असे श्री. राणे यांनी सांगितले.
आपला दृष्टिकोन केवळ क्षमतेच्या वाढीपुरते मर्यादित नाही, तर तो शाश्वततेवर आधारित आहे. ग्रीन लॉजिस्टिक्स, मल्टीमोडल इंटिग्रेशन, आणि किनारी समुदायांचे सबलीकरण हे आमच्या सागरी धोरणाचे मुख्य भाग आहेत.

आज महाराष्ट्रातील सर्वात महत्त्वाकांक्षी पायाभूत प्रकल्प म्हणजे वाढवण बंदर. हे एकदा कार्यान्वित झाल्यावर, जगातील टॉप १० खोल समुद्र बंदरांपैकी एक ठरेल. येथे उच्च दर्जाचे कंटेनर हाताळणी, खोल पाण्याची उपलब्धता आणि जागतिक दर्जाची लॉजिस्टिक्स सुविधा असेल. हे बंदर महाराष्ट्रासाठीच नाही, तर भारताच्या जागतिक व्यापारातल्या भूमिकेसाठीही गेमचेंजर ठरेल, असा विश्वास श्री. राणे यांनी यावेळी व्यक्त केला.
नेदरलँड्स दौऱ्यामुळे आंतरराष्ट्रीय संधी खुले झाल्या आहेत. या दौऱ्यात अनेक संस्था बरोबर सामंजस करार करण्यात आले आहेत. यातून महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक येणार आहे. तसेच राज्यातील सहा आयटीआय चे आधुनिककरण होणार असून त्याद्वारे दरवर्षी ७,००० युवकांना आधुनिक सागरी कौशल्यांचे प्रशिक्षण मिळणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

महाराष्ट्र सरकारने 'शिपबिल्डिंग, शिप रिपेअर व शिप रीसायकलिंग पॉलिसी २०२५' जाहीर केली. या धोरणांतर्गत प्रकल्पांना भांडवली अनुदान, कौशल्यविकासासाठी वित्तीय प्रोत्साहन, जलद परवानगी प्रक्रिया उपलब्ध करून देण्यात येणार आहे, असेही श्री राणे यांनी सांगितले.
महाराष्ट्र भारताच्या मेरीटाईम परिवर्तनाचे नेतृत्व करण्यासाठी आपण तयार असून आपल्याकडे धोरण, जमीन, पायाभूत सुविधा आणि नेतृत्व आहे. आता भागीदार हवे असून यासाठी हे समिट महत्वाची असल्याचे मंत्री श्री. राणे यांनी सांगितले.
श्री. शेठी यांनी प्रस्ताविकात राज्यातील बंदर विकासात करण्यात येत असलेल्या पायाभूत सुविधा, कनेटीव्हीटी याबद्दल माहिती दिली.

# नोकरदार महिलांच्या लैंगिक छळापासून संरक्षणासाठी कार्यशाळा

## (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम २०१३ या कायद्यांर्गत कार्यशाळा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम 2013 या कायद्यांर्गत शासकीय / निमशासकीय तसेच खाजगी कार्यालयात गठीत अंतर्गत समितीचे (IC) अध्यक्षांसाठी राष्ट्रीय महिला आयोग, नवी दिल्ली यांनी दि.18 जुलै 2025 रोजी एक दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा सकाळी



10 वाजता नियोजन भवन, पहिला मजला, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, कोर्ट नाका, ठाणे (प.) येथे आयोजित करण्यात आली आहे.
ही कार्यशाळा राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजयाताई रहाटकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे. तसेच जिल्ह्यातील वरिष्ठ अधिकारी यांना आमंत्रित करण्यात आले असून ठाणे जिल्ह्यातील शासकीय / निमशासकीय व खाजगी आस्थापनेवरील कार्यालयांतर्गत गठीत अंतर्गत समितीचे (IC) अध्यक्ष व अधिकारी कार्यशाळेस उपस्थित राहणार आहेत, असे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी नमिता शिंदे यांनी कळविले आहे.

# वसई-विरार महापालिका क्षेत्रात रिंग रोडसाठी नव्याने प्रस्ताव तयार करा : देवेंद्र फडणवीस

## प्राथमिक शाळा व प्राथमिक आरोग्य केंद्र महापालिकेकडे लवकरात लवकर हस्तांतरित करा

## महापालिका क्षेत्रातील अनाधिकृत बांधकामांवर तातडीने कारवाई करा



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : वसई - विरार परिसराचा झपाट्याने विकास होत आहे या भागाकरिता रिंग रोडसाठी नव्याने प्रस्ताव तयार करावा.जिल्हा परिषदेच्या अखत्यारितील प्राथमिक शाळा व प्राथमिक आरोग्य केंद्राचे लवकरात लवकर महापालिकेकडे हस्तांतर कराव्यात.महापालिका क्षेत्रातील सुरू असलेल्या सर्व कामांचा निर्धारित कालावधीतील कार्यक्रम आखून सर्व कामे विहित कालावधीत पूर्ण करावीत. महापालिका क्षेत्रातील अनाधिकृत बांधकामांवर आगामी एक महिन्याच्या कालावधीत महापालिका आणि गृह विभागाने कारवाई करावी असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

वसई विधानसभा मतदारसंघातील प्रश्नाबाबत बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. या बैठकीला खासदार डॉ. हेमंत सावरा,आमदार राजन नाईक,आमदार स्नेहा दुबे या बैठकीला उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, वसई-विरार महापालिकेने पायाभूत सुविधांची कामे करताना एक कालबध्द कार्यक्रमाचे नियोजन करून आरोग्य,रस्ते,पुलांची प्रलंबित कामे, परिवहन,गृहनिर्माण प्रकल्प यासह सर्व विभागातील कामांचा प्राधान्यक्रम ठरवून विहित कालावधीत कामे पूर्ण करण्यावर भर द्यावा. महापालिका क्षेत्रातील ज्या रस्त्यांसाठी जागा उपलब्ध आहे अशा रस्त्यांसाठी नगरविकास विभागाने निधी वितरीत करावा ही कामे पूर्ण होण्यासाठी महापालिकेने लक्ष द्यावे.जिल्हा परिषदेच्या अखत्यारित असलेल्या प्राथमिक शाळा व प्राथमिक आरोग्य केंद्रे तातडीने महापालिकेकडे वर्ग करावीत.महापालिका क्षेत्रातील रस्ते कॉंक्रीटचे करावेत असेही मुख्यमंत्री म्हणाले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, महापालिका क्षेत्रात पार्किंगची खूप मोठी समस्या आहे यासाठी परिवहन विभागाने पार्किंग झोन सार्वजनिक-खाजगी भागीदारे व्दारे निर्माण करण्याची कार्यवाही गतीने करावी. वाहतूक कोंडी टाळण्यासाठी पार्किंग झोन होणे अत्यंत आवश्यक आहे.या क्षेत्रात होणा-या इमारतींचे बांधकाम तसेच विविध परवानग्या देताना महापालिकेने कायदेशीर बाबी तपासून घेणे आवश्यक आहे. महापालिका क्षेत्रातील बांधकासाठी काटेकोरपणे नियमांची अंमलबजावणी करण्यात यावी.आचोळे येथे उभारण्यात येणा-या मल्टीस्पेशालिटी रूग्णालयाचे कामही गतीने करावे.मालमत्ता व कर वसुलीसाठी अभय योजना राबवावी यामध्ये महापालिकेशी संबधित बाबींचा समावेश करून घ्यावा.महापालिकेत नियमीत असलेल्या पदावरचे अधिकारी यांच्याकडेच पदभार देण्यात यावा असेही मुख्यमंत्री म्हणाले.

या बैठकीला परिवहन विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी,नगरविकास विभागाचे अपर मुख्य सचिव असिम कुमार गुप्ता, प्रधान सचिव डॉ. के. एच. गोविंदराज, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, मुख्यमंत्री यांचे सचिव श्रीकर परदेशी, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणचे महानगरआयुक्त डॉ.संजय मुखर्जी,आरोग्य विभागाचे सचिव डॉ.निपुण विनायक,वसई-विरार महानगरपालिकेचे आयुक्त डॉ.अनिल पवार,जिल्हा परिषद पालघरचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे,महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ.माधव कुसेकर, मीरा,भाईंदर, वसई, विरारचे पोलीस उपायुक्त निकेत कौशिक यावेळी उपस्थित होते.

# खरीपात कृषी विभागाच्या मोहिमांचा धडाका

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कृषी विभागामार्फत शेतकऱ्यांना तांत्रिक मार्गदर्शन उपलब्ध व्हावे यासाठी अनेक योजना उपक्रम राबविण्यात येतात. त्यातून वेळोवेळी उत्पन्न वाढीसाठी शेतकऱ्यांना याचा लाभ होतो. माहे एप्रिल २०२५ पासून जिल्ह्यामध्ये क्षेत्रीयस्तरावर व्यापक प्रमाणात व मोहीम स्वरूपात कार्यक्रम घेतले जात आहेत. आतापर्यंत शेतकऱ्यांसाठी विविध विषयांच्या एकूण सोळा हजार मोहीमा घेण्यात आल्या आहेत. खरीप हंगाम पूर्वतयारीसाठी ग्रामस्तरावर तसेच तालुकास्तरावर खरीप हंगामपूर्व सभांचे आयोजन करण्यात आले. याद्वारे खरीप हंगामामध्ये करावयाच्या शेतीचे नियोजन व कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या मोहीम स्वरूपातील कार्यक्रमांची सविस्तर रूपरेषा याबाबत प्राथमिक माहिती शेतकऱ्यांना देण्यात आली. या कार्यक्रमांतर्गत सातारा जिल्ह्यातील प्रत्येक गावामध्ये कृषी विषयक मोहीमा सुरू करण्यात आल्या, आतापर्यंत विविध विषयांचे एकूण सोळा हजार मोहीम घेण्यात आल्या आहेत.

या मोहिमेमध्ये बीज प्रक्रिया मोहीम, घरचे सोयाबीन उगवण क्षमता चाचणी, हुमणी कीड व्यवस्थापन, बीबीएफ मूलस्थानी जलसंधारण पट्टापेर पद्धत, माती परीक्षण मोहीम, जमीन सुपीकता निर्देशांक आधारित खताचा वापर, जमीन आरोग्य पत्रिका वाटप, व्हाट्सअप ग्रुप, खरीप हंगाम तयारीची ग्रामपंचायतस्तरावर सभा व प्रमुख खरीप पिकांच्या तंत्रज्ञान प्रसारासाठी गाव निहाय प्रशिक्षण, कृषी निविष्ठा यांच्या वाजवी वापरा बाबत जनजागृती मोहीम, सेंद्रीय निविष्ठा निर्मिती व वापर, कृषी विषयक माहिती तंत्रज्ञानाची साधने बाबत माहिती देणे, कृषी आधारित व्यवसाय युनिट उभारणी, एकात्मिक कीड व रोग व्यवस्थापन मोहीम, खरीप पिकांच्या रोपवाटिका, ऊस सुपरकेन नर्सरी तंत्रज्ञान, भात शेती यांत्रिकीकरण मोहीम भात पिकामध्ये युरिया ब्रिकेटचा उपलब्धता व वापर वाढवणे, पाणी फाउंडेशन डिजिटल शेतीशाळा, विकसित कृषी संकल्प अभियान इत्यादी मोहिमांच्या माध्यमातून कृषी विभाग शेतक-यांच्या प्रत्यक्ष बांधावर जाऊन शेतक-यांना मार्गदर्शन करीत आहे. बीज प्रक्रिया 2 हजार 828 मोहिमा, घरचे सोयाबीन उगवण क्षमता चाचणी 2 हजार 67, हुमणी किड व्यवस्थापन 1 हजार 123, बीबीएफ मूलस्थानी जलसंधारण पट्टापेर पद्ध 520, माती परीक्षण मोहिम, जमीन सुपीकता निर्देशांक आधारित खताचा वापर, जमीन आरोग्य पत्रिका वाटप 1 हजार 850, व्हाट्सअप ग्रुप 930, खरीप हंगाम तयारीची ग्रामपंचायतस्तरावर सभा व प्रमुख खरीप पिकांच्या तंत्रज्ञान प्रसारासाठी गाव निहाय प्रशिक्षण 1 हजार 724, कृषी निविष्ठा यांच्या वाजवी वापरा बाबत जनजागृती मोहिम 1 हजार 259, सेंद्रीय निविष्ठा निर्मिती व वापर 895, कृषी विषयक माहिती तंत्रज्ञानाची साधनेबाबत माहिती देणे 970, कृषी आधारित व्यवसाय युनिट उभारणी 326, एकात्मिक कीड व रोग व्यवस्थापन मोहिम 748, खरीप पिकांच्या रोपवाटिका,ऊस सुपरकेन नर्सरी तंत्रज्ञान 353, भात शेती यांत्रिकरण मोहिम भात पिकामध्ये युरिया ब्रिकेटचा उपलब्धता व वापर वाढवणे 187, पाणी फाउंडेशन डिजिटल शेतीशाळा 52 व विकसति कृषी संकल्प अभियान 235 अशा प्रकारे एकूण 16 हजार 67 मोहिमा राबविण्यात आल्या.खरीप हंगामामध्ये या मोहिमेच्या माध्यमातून क्षेत्रीयस्तरावर शास्त्रीय पद्धतीने माती परीक्षणाचे नमुने गोळा करण्याची पद्धत याबाबत प्रात्यक्षिके घेण्यात येत आहेत. माती परीक्षणाचे शेतीतील महत्त्व व माती परीक्षण अहवालाच्या आधारे संतुलित खतांचा वापर करणे याबाबत व्यापक जनजागृती करण्यात येत आहे. बियाण्याची उगवण चांगली होण्यासाठी व पीक वाढीच्या प्राथमिक टप्प्यात कीड व रोगाचा प्रादुर्भाव होऊ नये यासाठी बीज प्रक्रिया प्रात्यक्षिकांचे तसेच ज्या पिकांचे घरगुती बियाणे शेतकरी वापरतात त्या पिकांचे बियाण्यांच्या उगवणक्षमतेबाबत खात्री करणे आवश्यक आहे, यासाठी सोयाबीन बरोबरच इतर पिकांच्याही बियाण्यांची उगवणक्षमता तपासण्याच्या पध्दतीबाबत प्रचार, प्रसार करण्यात येत आहे. खरीप हंगामात मुख्य पिकांच्या लागवड तंत्रज्ञानाबाबत प्रात्यक्षिक आधारित शेतीशाळा व प्रशिक्षण कार्यक्रमही राबविण्यात येत आहेत. कृषी यांत्रिकीकरण प्रचार व प्रसार, महाडीबीटी प्रणालीवर अर्ज वाढविणे व कृषी विभाग, कृषी सेवा केंद्र, कृषी विद्यापीठे यांच्या संयुक्त विद्यमाने कृषी निविष्ठांच्या वाजवी वापराबाबत जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे. पीक वाढीच्या सुरुवातीच्या काळातच काही ठिकाणी जास्त तीव्रतेच्या रसायनांचा वापर केला जातो यामुळे पीक परिसंस्थेवर व मानवी आरोग्यावर अनिष्ट परिणाम होतात, हे टाळण्यासाठी पीक संरक्षक निविष्ठांचा संतुलित वापर करण्याबाबत प्रचार व प्रसार करण्यात येत आहे. सेंद्रीय निविष्ठा तयार करणे व त्याच्या वापराबाबत प्रचार प्रसिद्धी करण्यात येत आहे. कृषी निविष्ठा वापरताना घ्यावयाची काळजी व वापरलेल्या निविष्ठांची वेष्टने, रिकामे डबे यांची योग्य विल्हेवाट लावणे, कीटकनाशके व रासायनिक औषधांच्या लेबल क्लेम विषयी जनजागृती केली जात आहे.

खरीप हंगामातील विविध पिकांच्या कीड व रोग व्यवस्थापणाबाबत शेतक-यांना माहिती दिली जात आहे सर्वसाधारणपणे उसाच्या क्षेत्रात हुमणी किड आढळून येते. हुमणी कीड व्यवस्थापनाकरिता एकात्मिक पद्धतीचा अवलंब करणे अत्यावश्यक आहे. प्राधान्याने ऊस क्षेत्राच्या पट्ट्यात याची प्रभावी अंमलबजावणी करणे आवश्यक आहे अशा भागामध्ये तसेच इतरही क्षेत्रात हुमणी किडीचा प्रादुर्भाव आढळून येत असल्यास त्याठिकाणीसुद्धा हुमणी किड नियंत्रणाबाबत प्रचार, प्रसार व प्रकाश सापळे प्रात्यक्षिक घेण्यात येत आहेत. ऊस सुपरकेन नर्सरी तंत्रज्ञान पद्धतीनुसार रोपवाटिकेमध्ये उसाचे एक डोळे बेणे लाऊन वाढविल्यास सरासरी पाण्याची बचत होते. या नावीन्यपूर्ण पद्धतीचा अवलंब करण्यासाठी क्षेत्रीयस्तरावर प्रयत्न करण्यात येत आहे.

कृषी विषयक तांत्रिक माहिती, कृषी विभागाच्या विविध योजना जास्तीत जास्त शेतकऱ्यांपर्यंत समाज माध्यमाद्वारेही पोहोचण्यासाठी जिल्ह्याच्या कृषी विभाग या नावाचे व्हाटसॲप चॅनल तयार करण्यात आलेला आहे. याद्वारे शेतकऱ्यांपर्यंत माहिती पोहचविण्यात येते. तसेच गावोगावी क्यू आर कोडही लावण्यात आलेले आहेत या क्यूआर कोडच्या माध्यमातून शेतकऱ्यांसाठी असणाऱ्या विविध योजनांची माहिती मोबाईलवर उपलब्ध होत आहे.

कृषी विषयक विविध योजना, उपक्रम व कृषी तंत्रज्ञान जास्तीतजास्त शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी कृषी विभाग प्रयत्नशील आहे. तसेच सदरच्या मोहिमा यापुढील कालावधीत देखील सुरू राहणार असून शेतकऱ्यांचे पिक उत्पादन वाढीसाठी प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या बांधावर कृषी विभाग कार्यरत राहणार आहे. कृषी विभागाच्या सोळा हजार मोहिमेतून नक्की शेतकऱ्यांचे कृषी उत्पन्नात वाढ होईल यात शंका नाही.




# पेण तालुक्यातील ६४ ग्रामपंचायतीच्या सरपंच पदाचे आरक्षण जाहीर

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : पेण तालुक्याच्या ६४ ग्रामपंचायतींच्या सरपंच पदाची आरक्षण सोडत १५ जुलै रोजी म्हाडा कॉलनी येथील गुरुकुल शाळेच्या सभागृहात प्रांताधिकारी प्रवीण पवार, तहसिलदार तानाजी शेजाळ यांच्या उपस्थितीत जाहीर करण्यात आले.

यावेळी तालुक्यात एकमेव अंतोरे ग्रामपंचायत ही अनुसूचित जातीसाठी आरक्षित करण्यात आली. असून यातील १४ ग्रामपंचायती अनुसूचित जमातीसाठी त्यापैकी खुल्या गटासाठी गागोदे खुर्द, जोहे, काळेश्री, कणे, कळवे, मसद बुद्रुक, दिव तर दूरशेत, हमरापुर, आमटेम, वाशी, वढाव, जिते, सोनखार या सात ग्रामपंचायती महिलांसाठी राखीव करण्यात आल्या आहेत.यासह नागरिकांचा मागास प्रवर्ग या खुल्या गटासाठी आंबेघर, शेडाशी, वडखळ, मळेघर, बेणसे, खरोशी, कोपर, बोरगाव या आठ ग्रामपंचायती तर यातील महिला प्रवर्गासाठी वरवणे, वरेडी, शिर्की, रोडे, रावे, सापोली, बेलवडे बुद्रुक, कामार्ली, जावळी या नऊ ग्रामपंचायतीच्या सरपंच पदाचा आरक्षण जाहीर करण्यात आला आहे.यामधील खुला प्रवर्गासाठी आरक्षित ग्रामपंचायत कासू, कुहिरे, दादर, बोरी, काराव, निगडे, दुष्मी, बळवली, तरणखोप, करंबेली छत्तीशी, पाबळ, महलमि-या डोंगर, वरसई, मुंढानी, आंबिवली, बोर्झे या सोळा ग्रामपंचायतींचा समावेश करण्यात आला असून यातील महिला प्रवर्गासाठी जिर्णे, कांदळे, झोतिरपाडा, निधवली, खारपाले, डोलवी, कोलेटी, पाटणोली, कोप्रोली, उंबर्डे, शिहू, सावरसई, करोटी, वाशिवली, वरप, वाकरुळ या सोळा ग्रामपंचायतींचा समावेश आहे. त्यामुळे पेण तालुक्यातील एकूण ६४ ग्रामपंचायतीच्या सरपंच पदाच्या आरक्षणाची सोडत आज जाहीर करण्यात आल्यामुळे येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये खऱ्या अर्थाने चुरस निर्माण होणार असल्याचे दिसून येत आहे.तर यावेळी काही ग्रामपंचायतींच्या सरपंच पदाची आरक्षण सोडत शाळेतील विद्यार्थ्यांच्या हस्ते चिट्ठी काढून जाहीर करण्यात आली.

### धसई प्राथमिक आरोग्य केंद्रात

# क्षयरोग कार्यक्रमाचा आढावा

## 'निक्षय पोषण किट' वितरणाचा तालुकास्तरीय शुभारंभ

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



ठाणे : जिल्हा मुरबाड तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र, धसई येथे दिनांक १५ जुलै, २०२५ रोजी राष्ट्रीय क्षयरोग कार्यक्रमाच्या आढाव्यासाठी जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. अलका परगे यांनी भे ट दिली. त्यांच्या उपस्थितीत कार्यक्रमाचा सविस्तर आढावा घेण्यात आला व क्षयरोग नियंत्रणासाठी सुरू असलेल्या उपाययोजनांबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी क्षयरोग रुग्णांच्या पोषणासाठी Welfare Society for Destitute Children, एकलहरे या स्वयंसेवी संस्थेच्या सहकार्याने "निक्षय पोषण किट" वाटप उपक्रमाचा तालुकास्तरीय शुभारंभ देखील डॉ. परगे यांच्या हस्ते करण्यात आला. या उपक्रमांतर्गत मुरबाड तालुक्यातील सर्व सक्रिय क्षयरोग रुग्णांना नियमित पोषण किट देण्यात येणार आहेत.

या प्रसंगी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. बनसोडे यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन करत क्षयरोगाच्या प्रतिबंधासाठी आरोग्य विभागाच्या विविध योजनांची माहिती दिली. त्यांनी या उपक्रमाचे कौतुक करत सामाजिक सहभागाच्या माध्यमातून आरोग्यविषयक जनजागृती होण्याची आवश्यकता व्यक्त केली.

कार्यक्रमास वैद्यकीय अधिकारी डॉ. नंदकिशोर गोर्डे, आरोग्य सहायक, आरोग्य कर्मचारी तसेच आशा स्वयंसेविका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

या उपक्रमाच्या माध्यमातून केवळ औषधोपचार नव्हे तर रुग्णांच्या पोषण स्थितीकडेही लक्ष देण्यात येत आहे, जे राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमाच्या उद्दिष्टांनुसार आरोग्यदायी समाज घडवण्यासाठी महत्त्वाचे आहे, असे डॉ. परगे यांनी यावेळी स्पष्ट केले.

# दिग्दर्शक धीरज कुमार अनंतात विलीन



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : ज्येष्ठ निर्माते, दिग्दर्शक तसेच अभिनेते धीरज कुमार (वय ७८) यांच्या पार्थिवावर बुधवारी विलेपाले येथील पवनहंस स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांना अखेरचा निरोप देण्यासाठी नातेवाइकांसह मनोरंजन क्षेत्रातील अनेक मंडळी उपस्थित होती.

अंधेरीतील कोकिळाबेन रुग्णालयात मंगळवारी सकाळी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच मनोरंजन क्षेत्रात शोककळा पसरली. त्यानंतर बुधवारी सकाळी त्यांचे पार्थिव अंधेरीतील त्यांच्या राहत्या घरी अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आले होते. दिवंगत अभिनेते मनोज कुमार यांचा मुलगा कृणाल गोस्वामी, अभिनेते रझा मुराद, अभिनेत्री टीना घई, अभिनेते रमेश गोयल, दिग्दर्शक सिद्धार्थ नागर, अभिनेते अली खान आदींनी धीरज कुमार यांचे अंत्यदर्शन घेतले. त्यानंतर पवनहंस स्मशानभूमीत अत्यंत शोकाकुल वातावरणात त्यांना अखेरचा निरोप देण्यात आला.

# ज्येष्ठ नागरिकांसाठी मोलाचे मार्गदर्शन



स्थावर मालमत्तेमध्ये वरीष्ठ नागरीक मनाने गुंतलेले असतात, तसे हल्लीची पिढी करीत नाही. आधुनिक पिढी ही त्या बाबतीत भावनाहीन म्हणजे प्रॅक्टिकल आहे. पूर्वीच्या पिढीने मोठमोठी घरे बांधली, ती मुलांसाठी आणि नातवंडांसाठी देखील! कमावलेला सारा पैसा बहुतेकांनी आपल्या पुढच्या पिढीचा विचार करतच खर्च केला. ना हे वरीष्ठ कुठे लांब सहलीला गेले, ना कधी परदेशात जाऊन लाखो रुपये खर्च केले. ना आठवड्यातून एकदा पिझ्झा मागवला, ना बर्गर! नाटक सिनेमा सुद्धा वर्षातून दोन तीन वेळा! पैसे फक्त मुलांसाठी राखून ठेवायचे, झालेच तर एक दुसरा फ्लॅट घेऊन ठेवायचा, जो स्वतःसाठी काही उपयोगाचा नाही. शहरात राहात असेल तर गावी घर बांधायचे, जमीन विकत घ्यायची, असे उद्योग केले.

परीणाम झाले काय..? तर मुलांना आधुनिक शिक्षण दिले जे फक्त आणि फक्त नोकरीभिमुख आहे. कुठलीही शाळा, किमान भारतातील तरी, व्यवसाय वा धंदा किंवा उत्पादनाभिमुख उद्योग कसा करावा हे शिकवित नाही. डॉक्टर होण्यासाठी साधारण एक कोटी रुपये लहानपणापासून खर्च येतो. मग तो वसूल करण्यासाठी, सर्व नसतील तरी बहुतेक सारे नवीन डॉक्टर, डॉक्टरी म्हणजे सेवा व व्यवसाय नसून धंदा या दृष्टीने पाहायला लागलेत. त्यामुळे औषधे व उपचार या दोन्हींमध्ये भ्रष्टाचार व स्कॅम सुरु आहेत. इंजिनियर होऊन दहा हजारातील एक मुलगा उत्पादनप्रणित उद्योगांकडे वळतो. बाकीचे ९९९९ इंजिनिअर फक्त इतर शहरात किंवा परदेशात मोठ्या पगाराच्या नोकरीच्या मागे असतात. स्थिर होईपर्यंत पाच सात कंपन्या सोडलेल्या असतात.

*आपल्या मुळ गावी न राहील्यामुळे, इतर ठिकाणी, दुसऱ्या शहरात वा परदेशात कायम वास्तव्य करायचे ठरवल्याने इथल्या मालमत्तेमध्ये नवीन पिढीला अजिबात रस नसतो! पुढील पिढीला हे घर, जमीनजुमला याकडे पाहायला, त्याची निगा राखायला वेळ नाही. आणि त्यांना त्यात रस नाही, निष्ठा नाही! मग आईवडीलांचे निधन झाल्यावर काही मुले ती जमीन, घर विकून पैसे घेऊन निघून जातात. परदेशात राहाणारी कित्येक मुले मुली, आईवडील जिवंत असताना येत नाहीत, वेळ नाही या सबबीवर! पण ते वर गेल्यावर मात्र इथे सारे आर्थिक हिशोब निपटायला एक दीड महिन्याची रजा मिळते!*

हे मी अनुभवले आहे. बँकेत अशा काही मुलांचा, जेष्ठ नागरीकांचा अनुभव आलेला आहे. आश्चर्य म्हणजे मागील पिढीचा मोह, मुलांविषयीच्या अपेक्षा काही कमी होत नाहीत. सगळ्या स्थावर व बँकेतील पैशांना वारस म्हणून आपल्या मुलाला वा मुलीलाच ठेवतात, जे दूर राहून, परदेशी राहून, कधी आईबापाच्या आजारपणात देखील भेटायला न येणाऱ्या ह्या मुलांना, ते गेल्यावर एक छोटी मोठी लॉटरीच लागते ! हे मी अनुभवांती बोलतोय. कारण मी वीस पंचवीस वर्षे पब्लिक रिलेशनमध्ये काम केले आहे.

हे वरीष्ठ नागरीक, पूर्वीची पिढी सोन्या चांदीचे दागिनेही आपल्या मुलाबाळांसाठी करून ठेवतात. हल्लीच्या पिढीला जुन्या नक्षीकामाचे दागिने पसंत नाहीत, तर पाश्चात्य लोकांप्रमाणे नव्या डिझाईनचे / खोटे म्हणजे इमिटेशन ज्वेलरी पसंत आहे. म्हणजे त्याचाही हल्ली काही उपयोग नाही.

नवी पिढी पैसे कमावणे आणि पैसे खर्च करणे एवढेच जाणते! पण त्यांना पैसे कमावण्यायोग्य ज्या पिढीने केले, त्यांचे अनुभव, त्यांची आस्था, प्रेम, निष्ठा याच्याशी नवीन पिढीला काही कर्तव्य नाही. पूर्वीच्या पिढीने आपल्या कर्तव्यापुढे आपली मौजमजा बाजूला ठेवली. गरजे नुसारच खर्च केला. पण मुलांना अगदी कुठल्याही अडचणींशिवाय, त्रासापासून मुक्त असे वाढविले. जे आपल्याला मिळाले नाही, त्याची वानवा नव्या पिढीला पडू नये, याची काळजी घेऊन उच्च शिक्षण त्यांच्या क्षमतेनुसार दिले. पण बरेच वरीष्ठ आपल्या पुढच्या पिढीला हवे तसे चांगले संस्कार देण्यात कमी पडली, कमी पडते आहे असे माझे स्पष्ट मत आहे.

आपले आईवडील आपल्याला परीस्थितीची जाणीव देत असत. गरीब आहोत, की मध्यामवर्गीय हे मुलांना ठाऊक असे. पैसेवाले देखील आपल्या मुलांचे पाय जमिनीवर राहावेत याची काळजी घेत. पूर्वी अगदी क्वचित कोणी बाईक वा कार ने शाळेत येत असे. अन्यथा श्रीमंत मुले फार तर सायकलवर येत. पूर्वीच्या पिढीने खाऊ वाटताना आपला परका असा मुलांमध्ये भेदभाव केला नाही. हुशार विद्यार्थ्यांना काही श्रीमंतांनी मदत केली पुढे जायला! आता मात्र चित्र बदलले आहे. नवी पिढी बऱ्यापैकी स्वार्थी झाली आहे, अन ह्याला कारण पूर्वीचीच पिढी आहे. नवी पिढी स्वतःच्या सुखाकडे म्हणजे ऐहीक सुखाकडे जास्त लक्ष देत आहे. टी व्ही, फ्रिज, कार, लॅपटॉप, नवनवे मोबाईल, बाईक, स्कुटी आणि घरातील इतर सुखसोयी त्यांना नाते वा संस्कार यापेक्षा जास्त महत्वाच्या वाटतात!

वरीष्ठ आता आपला भार मुलांवर पडू नये असे शक्यतो पाहातात. पण हल्ली नातवंडांची जबाबदारी देखील, जर एकत्र राहात असतील तर घेतात.

*ही जी जबाबदारीची आणि कर्तव्याची जाणीव मागील पिढीला होती व आहे तीच जाणीव आताच्या पिढीमध्ये कमी होत चालली आहे! आधीच्या पिढीने आता हे ध्यानात ठेवावे की आयुष्यमान वाढते आहे, राहाणीमान महाग होते आहे, अशा वेळी तुम्ही स्वतःकडे केव्हा पाहाणार आहात...? आपली संपत्ती आपल्या मृत्यूनंतर इथेच राहाणार आहे. पुढील पिढीला ती आयती संपत्ती मिळाल्यावर त्यांना त्या संपत्तीचे मोल असणार नाही. कारण रुपयाचे अवमूल्यन कमी होत आहे. कालचे तुमचे हजार रुपये आज एक रुपया समान आहे. आता तरी पुढील पिढीच्या सुखासाठी आपले सुख बाजूला सारु नका. तुम्ही त्यांना कमावण्यायोग्य बनवले आहे. ते त्यांचे जीवन जगत आहेत. तुम्हीही तुमचे जीवन जगा! जीवनाचा आनंद घ्यायला आता तरी शिका. बरेच भारतीय आपले जीवन कंजुष पणाने जगतात, काटकसरीने खर्च करतात ते केवळ पुढील पिढीने श्रीमंत व्हावे, त्यांना काही कमी पडू नये म्हणून! पण आता हे बंद करा. स्वतःसाठी जगायला शिका. स्वतःचे छंद, इच्छा यावर खर्च करा. राहीलेल्या इच्छांची एक यादी करा. त्या यादीतील एक एक इच्छा पुरी करण्यासाठी जगा. जुन्या मित्रमैत्रिणींना भेटा! साठ पासष्ठ म्हणजे काही मरण्याचे वय नव्हे! आता अजून किती दिवस जगणार आहोत, हा विचार सोडा! समजा, तुम्हाला परमेश्वराने नव्वद ते शंभर वर्षांचे आयुष्य दिले असेल तर अजून तुमच्याकडे वीस पंचवीस किंवा तीस वर्षे शिल्लक आहेत, जी तुम्ही पूर्णपणे स्वतःसाठी जगू शकाल! पुरे झाले आता इतरांसाठी जगणे! "आता आपले काय राहीलेय..?" हा विचार करीत राहाल तर शेवटची काही वर्षे आजारपणात, इतरांच्या वर अवलंबून काढावी लागतील, हे लक्षात ठेवा! दिर्घायुषी व्हा, निरोगी राहा. गरीबीत भले जन्माला आला असाल, श्रीमंत म्हणून फक्त मरू नका, तर श्रीमंतीत जगा! मस्तीत राहा, लहान लहान गोष्टीत आनंद मिळवा!*

# जनताहित फाउंडेशनचा सामाजिक उपक्रम

## सशक्त, शिक्षित आणि पर्यावरणपूरक समाजाच्या दिशेने व्यापक चळवळ सुरु

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

टिटवाळा : आजच्या बदलत्या भारतात जेव्हा समाजातील अनेक घटक शिक्षण, आरोग्य आणि निवाऱ्याच्या मूलभूत गरजांपासून वंचित आहेत, तेव्हा जनताहित फाउंडेशन ही संस्था त्या प्रत्येक दुर्लक्षित नागरिकासाठी आशेचा किरण ठरणार आहे. या संस्थेचा उद्देश केवळ मदत करणे नाही, तर एक असा भारत घडवणे आहे जिथे प्रत्येक नागरिक शिक्षित, सशक्त, आत्मनिर्भर आणि पर्यावरण-संवेदनशील असेल.



जनताहित फाउंडेशनने देशभरातील सरकारी शाळांमध्ये डिजिटल शिक्षण, इंग्रजी भाषा कौशल्य आणि मोफत स्पर्धा परीक्षा कोचिंग उपलब्ध करून देण्याचा उपक्रम सुरू करणार आहेत. यामध्ये ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडण्यासाठी कंप्युटर क्लासेस, जागतिक स्तरावरील संवादासाठी इंग्लिश स्पीकिंग कोर्सेस, आणि आर्थिक दुर्बल विद्यार्थ्यांसाठी निःशुल्क मार्गदर्शन वर्ग हे उपक्रम करण्याचा संस्थेचा मानस आहे .

याचबरोबर, गरीब, निराधार, विधवा, अपंग आणि भाड्याच्या घरात राहणाऱ्या कुटुंबांसाठी मालकी हक्काच्या घरांची योजना सुद्धा राबवली जाणार आहे, जी त्यांच्या आत्मसन्मान आणि सुरक्षिततेसाठी एक महत्त्वाचं पाऊल ठरणार आहे.

जनताहित फाउंडेशनने "एक नागरिक, एक कर्तव्य" ही जनजागृती मोहीमही सुरू केली असून ज्या अंतर्गत लोकांना त्यांच्या संविधानिक हक्क व कर्तव्यांविषयी जागरूक करून, सरकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी मार्गदर्शन केले जाते. लोकशाहीत सहभाग वाढवण्यासाठी जन समुदायांमध्ये जनजागृती करत आहे.

या सर्व सामाजिक उपक्रमांबरोबरच, पक्षी संवर्धन आणि निसर्ग रक्षण हेदेखील संस्थेच्या कार्याचा अविभाज्य भाग बनले आहे. वाढत्या शहरीकरणामुळे सिमेंटच्या जंगलांमध्ये पक्ष्यांचे अधिवास नष्ट होत चालले आहेत. त्यामुळे अनेक जाती नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. जनताहित फाउंडेशनचे संस्थापक, अध्यक्ष रितेश कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली चालणाऱ्या या उपक्रमांतून समाजात पक्षी आणि निसर्ग संवर्धनाची जागृती केली जात आहे.

आज पक्ष्यांच्या अधिवासाचा ऱ्हास, त्यांच्यावर होणारे अत्याचार, आणि नैसर्गिक आपत्ती यामुळे अनेक पक्षी संकटात आहेत. त्यामुळे जनताहित फाउंडेशनने शाळा, संस्था, सोसायट्या, आणि विविध परिसंस्थांमध्ये जाऊन पक्षी रक्षणाची माहिती देणे, जखमी पक्ष्यांचे उपचार करणे आणि नंतर त्यांना पुन्हा नैसर्गिक अधिवासात सुरक्षितपणे सोडणे हे कार्य हाती घेतले आहे.

सामाजिक न्याय आणि पर्यावरण रक्षण या दोन्ही आघाड्यांवर कार्य करत जनताहित फाउंडेशनने एक व्यापक परिवर्तन घडवण्याचा संकल्प घेतला असल्याची माहिती जनताहित फाउंडेशनचे सचिव नेयाज शेख यांनी दिली .




# म्हारळ गावात बिल्डरकडून बेकायदा उत्खनन ?

## स्थानिक नागरीकांची चौकशीची मागणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण मुरबाड रस्त्यालगत असलेल्या म्हारळ गावात एका बिल्डरने बेकायदेशीरपणे माती उत्खनन केले असल्याची तक्रार स्थानिक नागरीक प्रकाश साळवे यांनी ठाणे जिल्हाधिकारी आणि कोकण विभागीय आयुक्तांकडे केली आहे. तलाठ्यांनी केलेल्या स्थळ पाहणी अहवालात तफावत आहे. त्याचबरोबर साळवे यांना माहिती अधिकारात दिलेली माहिती ही देखील दिशाभूल करणारी असल्याने या प्रकरणात अनियमितता आढळत असल्याचा आरोप करत चौकशी करुन बिल्डरने बुडविलेला



सरकारी महसूल वसूल करण्यात यावा. संबंधित अधिकार्यांच्या विरोधात कारवाई करण्यात यावी अशी मागणी साळवे यांनी केली आहे.

स्थानिक नागरीक प्रकाश साळवे यांनी सांगितले की, म्हारळ गावात एका बिल्डरने माती उत्खनन करण्याची परवानगी न घेता उत्खनन केले आहे. याची तक्रार तलाठी अश्वीनी बोरसे यांच्याकडे करण्यात आली. २३ मे रोजी बोरसे यांनी स्थळ पाहणी केली. त्यानंतर पुन्हा २ जून रोजी पाहणी करुन त्याठिकाणी तीन हजार ब्रास मातीचे उत्खनन झाल्याचा अहवाल दिला. त्यानंतर तहसीलदारांना दिलेल्या अहवालात ११०० ब्रास मातीचे उत्खनन झाल्याचे म्हटले आहे. या माहितीत तफावत आहे. या प्रकरणी साळवे यांनी माहिती अधिकारात माहिती विचारली असता त्यांना दिशाभूल करणारी माहिती देण्यात आली आहे. त्याचबरोबर माहिती लपविण्याचा प्रकार करण्यात आला असल्याचे साळवे यांनी सांगितले आहे.

या प्रकरणी जिल्हाधिकारी आणि कोकण विभागीय आयुक्तांनी चौकशी करावी. दोषींच्या विरोधात फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा. तसेच ज्या बिल्डराने सरकारी महसूल बुडविला आहे. त्याच्याकडून बुडालेला महसूल वसूल करण्यात यावा अशी मागणी केली आहे.

दरम्यान याबाबत कल्याण तहसीलदार सचिन शेजाळ यांच्याकडे विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, नायब तहसीलदार मंडळ आधिकारी तलाठी यांचे पथक या तक्रारी नुसार पाठविणार असून फेर पाहणी अंती अनियमिता आढळल्यास दंडात्मक कारवाई केली जाईल तसेच या संदर्भात तक्रार दाराला कळविले आहे."

# बोली भाषेची लाज बाळगू नका

-प्रशांत मोरे

### समाजसेवक अनिल घोडविंदे यांच्या वाढदिवसानिमित्त आई समजून घेतांना व्याख्यान संपन्न



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर : 'आपली बोली भाषा बोलतांना लाज बाळगू नका त्यामुळे आपली संस्कृती व संस्कार दिसत असतात त्यामुळे आपल्या भाषेचा अभिमान बाळगा असे आवाहन संगीतकार व कवी प्राध्यापक प्रशांत मोरे यांनी शहापूर तालुक्यातील समाजसेवक व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे निकटवर्तीय अनिल घोडविंदे यांच्या वाढदिवसा निमित्त आयोजित 'आई समजून घेताना'व्याख्यान देतांना खर्डीतील जीवनदीप महाविद्यालयात केले. यावेळी माजी आमदार पांडुरंग बरोरा, उद्योजक शिवाजीशेठ अधिकारी, आयुर्वेदाचार्य सुनील घोडविंदे, हभप बाळू मांजे, अजय सिंग, भगवान मोकाशी व प्राचार्य कैलास कळकटे यांच्यासह परिसरातील विवीध राजकीय पक्षाचे, संघटनाचे पदाधिकारी ,मित्र परिवार, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीच्या अध्यक्षपदी रवींद्र घोडविंदे यांची निवड झाल्याने त्यांच्या सत्काराचे आयोजन यावेळी करण्यात आले होते.यावेळी जीवनदीप विद्यालयातील विध्यार्थ्यांनी बनवलेल्या भीतीपत्रकाचे अनावर संगीतकार व कवी प्रशांत मोरे यांच्या हस्ते करण्यात आले.समाजसेवक अनिल घोडविंदे यांच्या वाढदिवसानिमित्त महाविद्यालयाच्या आवारात 10 झाडे लावून वृक्षारोपण करण्यात आले.प्रशांत मोरे यांनी 'आई समजावून घेतांना' चे व्याख्यान देताना बाप या विषयावर ही भावनिक मार्गदर्शन केल्याने उपस्थितांचे डोळे पाणावले यावेळी अनेक गाजलेल्या कविता गाऊन त्यांचे विश्लेषण केले. विद्यार्थ्यांनी आई वडिलांचे मित्र बनून त्यांना आधार देण्याची गरज असल्याचे प्रतिपादन यावेळी प्रशांत मोरे यांनी केले.

### माऊली ग्रुप डोंबिवली यांच्या वतीने

# उठावा शाळेत शैक्षणिक साहित्य वाटप

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर ग्रामीण : शहापूर तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा, उठावा या शाळेत माऊली ग्रुप डोंबिवली यांच्या वतीने विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.



येथील विद्यार्थ्यांची शैक्षणिक गरज लक्षात घेता तसेच सामाजिक कार्य व शैक्षणिक मदतीचा हात म्हणून माऊली ग्रुप डोंबिवली या ग्रुपच्या माध्यमातून जिल्हा परिषद शाळा, उठावा या शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय दप्तर, वह्या, पेन, पेन्सिल, कंपास, पाणी बाटली, खोडरबर, रंग खडू, परिक्षा पॅड आणि छत्री अशा स्वरूपात शैऊसाहित्य वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमावेळी माऊली ग्रुपचे पदाधिकारी चारुदत्त कोलारकर, मधूश्री कोलारकर, मुकुलजी टिळक, सोनाली टिळक, निलेशजी शेलार, पद्मिनी शेलार, मुख्याध्यापक भरत मगर, सहशिक्षिका अनिता दाते, अंगणवाडी सेविका संगीता आगिवले, ग्रामस्थ महिला गंगुबाई दुंभेले, गुलाबताई दुंभेले आदीजण उपस्थित होते.

# लक्ष्मी मार्केट भाजीपाला व्यापारी संघटनेच्या मागणीला सरकारकडून न्याय - रामदास यादव

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीच्या जागेत पत्र्याचे शेड उभारण्याच्या कामाचा शुभारंभ आज करण्यात आला असून लक्ष्मी मार्केट भाजीपाला व्यापारी संघटनेच्या मागणील सरकार कडून न्याय मिळाला असल्याची भवान लक्ष्मी मार्केट भाजीपाला व्यापारी संघटनेचे सचिव रामदास यादव यांनी व्यक्त केली आहे.

बाजार समितीच्या मार्केट यार्डात लक्ष्मी मार्केट भाजीपाला व्यापारी संघटनेचे पुर्वी शेड होते. याचे नूतनीकरण करून या जागेत पुनश्च पत्र्याचे शेड उभारण्यास राज्य शासन पणन संचालक, जिल्हा उपनिबंधक



यांच्या आदेशाने बाजार समिती सचिव संजय एगडे यांनी वरिष्ठांच्या आदेशाने कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने लक्ष्मी मार्केट भाजीपाला व्यापारी

### बाजार समितीच्या जागेत पत्र्याचे शेड उभारण्याच्या कामाचा शुभारंभ

संघटने सोबत नोंदणीकृत दस्तऐवज दि. ९-७-२०२५ रोजी करुन दिलं आहे. त्यानुसार आज उभारण्यात येणाऱ्या पत्राच्या शेडसाठी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसह उपस्थितांमार्फत भूमिपूजन करण्यात आले.

कल्याण शहरातील भाजीपाला व्यापारी क्षेत्रातील सर्वात जुनी व्यापारी संघटना लक्ष्मी मार्केट भाजीपाला व्यापारी संघटना ही नेहमीच शेतमालाचा व्यवसाय करणारे व्यापारी, शेतकरी ग्राहक यांच्या हितासाठी अनेक वर्षापासून काम करीत आहे. महाराष्ट्र राज्य शासनाने लक्ष्मी मार्केट भाजीपाला व्यापारी संघटनेस न्याय दिला त्याबाबत राज्य शासन, सबंधित वरिष्ठ अधिकारी, बाजारसमितीचे सचिव व प्रशासक यांचे रामदास यादव यांनी आभार मानले आहेत. दरम्यान भूमिपूजन प्रसंगी शासनाच्या आदेशाचा भंग करून अडथळा आणण्याचा बाजार समितीच्या कर्मचाऱ्यांनी प्रयत्न केला परंतु व्यापारी संघटनेने कायदेशीर कागदपत्रानुसार त्यांना परत पाठविले.

# माथाडी कामगार बोगस नोंदणी तपासणीसाठी विशेष मोहीम

- कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात 'एमआयडीसी'मधील कंपन्यांमध्ये माथाडी कामगार नोंदणी तपासणीसाठी विशेष मोहीम राबली जाईल. या तपासणी मोहिमेत माथाडी कामगार बोगस नोंदणी झाल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित कामगारांवर आणि अधिकाऱ्यांवरही कारवाई करण्यात येईल, असे कामगार मंत्री ॲड.आकाश फुंडकर



यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात सांगितले.

बोगस नोंदणी संदर्भात विधानसभेत लक्षवेधी सूचना मांडण्यात आली. लक्षवेधी सूचनेच्या चर्चेत सदस्य अभिजीत पाटील यांनी सहभाग घेतला.

कामगार मंत्री श्री. फुंडकर यांनी सांगितले की, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात शेंद्रा 'एमआयडीसी' मधील कंपनीमध्ये माथाडी कामगारांच्या बोगस नोंदणी प्रकरणी चौकशी समिती गठीत करण्यात आली आहे. या चौकशी समितीचा अहवाल प्राप्त झाल्यावर याप्रकरणी नियमानुसार आवश्यक कारवाई करण्यात येईल. या प्रकरणातील १७ कामगारांपैकी ११ कामगारांनी राजीनामे दिले आहेत. चौकशी समितीच्या अहवालात जे कामगार दोषी आढळतील त्यांच्यावर आणि दोषी अधिकाऱ्यांवरही गुन्हे दाखल केले जातील.

शासकीय गोदामातील नोंदीत माथाडी कामगारांच्या प्रलंबित अनुदान संदर्भात पुरवठा विभागासोबत बैठक घेऊन हा प्रश्न मार्गी लावला जाईल, असेही कामगार मंत्री श्री. फुंडकर यांनी सांगितले.




*Printed by AIS Printing Solution Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,*
*printed at Thane and published at Building No-B-24,Room no-9,gholap Nagar, Murbad Road, Neyr Anpam Nagar Kalyan west editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.*